# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807

ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230


क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 360 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 21.1.2026

प्रति,

**उप वनसंरक्षक,**

**( शिक्षण व प्रशिक्षण )**

**म.रा.पुणे.**

**विषय**:- माहे डिसेंबर 2025 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 63 मधील प्रशिक्षणार्थीचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले कॅम्पा योजने अंतर्गत वनरक्षक / वनपाल यांचे 05 दिवसीय अल्प मुदत उजळणी प्रशिक्षण व लिपीक / लेखापाल यांचे 30 व 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थीचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक 01/12/2025 ते 31/12/2025 पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 40 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )

**संचालक,**

**वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.**

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )

**संचालक,**

**वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.**

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नव नियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 01/10/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नव नियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 63 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **कॅम्पा योजने** अंतर्गत **वनरक्षक / वनपाल** यांचे **05 दिवसीय अल्प मुदत उजळणी** प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 08/**12/2025** ते 12/**12/2025**) व यासोबतच **कॅम्पा योजने** अंतर्गत **वनपाल** यांचे **30** दिवसीय दिर्घ मुदत प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 23/**12/2025** ते 21/**01/2026**) व **लिपीक / लेखापाल** यांचे 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 15/**12/2025** ते 28/**01/2026**) या कालावधीमध्ये **एकुण 04 सत्रांमध्ये** प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले.

**दिनांक** 01/12/2025 **ते** 31/12/2025 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक**, **कु. मुक्ताबाई वि. टेकाळे**, यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/12/2025 ते 31/12/2025** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 ) | 3 ते 6 |
| 02 | वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 ) | 7 ते 11 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र लेखी परीक्षा. ( दि. 08/12/2025 ते 17/12/2025 ) | 12 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 द्वितीय सत्र अभ्यासक्रम. | 13 ते 15 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा सर्पमित्र संवाद ( दि. 26/12/2025) अभ्यसक्रमा व्यतीरीक्त. | 16 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ. ( माहे डिसेंबर 2025 ) | 17 ते 21 |
| 07 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा आमझरी पर्यटन संकुल, चिखलदरा येथे अभ्यास दौरा. ( दि. 19/12/2025 ) | 22 |
| 08 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा गाविलगड किल्ला, चिखलदरा येथे अभ्यास दौरा.( दि. 30/12/2025 ) | 23 ते 24 |
| 09 | संत संताजी महाराज यांची जयंती. ( दि. 08/12/2025 ) | 25 |
| 10 | वीर बाल दिवस. ( दि. 26/12/2025 ) | 26 |
| 11 | डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती. ( दि. 27/12/2025 ) | 27 |
| 12 | वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती, यांच्या मार्फत STRENGTHENING WILDLIFE LAW ENFORCEMENT या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा. ( दि. 29/12/2025 ते 30/12/2025 ) | 28 ते 29 |
| 13 | वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे कॅम्पा योजने अंतर्गत वनरक्षक / वनपाल यांचे 05 दिवसीय अल्प मुदत उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम (माहे डिसेंबर 2025 ) | 30 ते 33 |
| 14 | वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे कॅम्पा योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल व वनपाल यांचे 30 व 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण कार्यक्रम. ( माहे डिसेंबर 2025 ) | 34 ते 40 |
| | | |

# 01. नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 )










**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 )**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि. 01/10/2025** पासुन नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र. 63** यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणाला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रथम सत्र अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| **सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 (कालावधी दि. 01/10/2025 ते 29/03/2026)** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ (**Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनस्पतीशास्त्र** | डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश:** वनस्पतींच्या रचनेचा, वाढीचा, वर्गीकरणाचा आणि त्यांच्या पर्यावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.<br>**मुख्य घटक:**<br>वनस्पतींची रचना (मूळ, खोड, पाने, फुले, बीज).<br>प्रकाशसंश्लेषण, श्वसन, पोषण प्रक्रिया.<br>वनस्पतींचे वर्गीकरण , वृक्ष, झुडपे, गवत इ.<br>वृक्षांची ओळख (Tree Identification) आणि स्थानिक जातींचे महत्व.<br>बीज संकलन, अंकुरण, रोपवाटिका व्यवस्थापन. |
| 03 | **वनसंवर्धन शास्त्र (भाग-01)** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** वन वृक्षांचे संवर्धन, वाढ, आणि पुनरुत्पादन यांचा अभ्यास.<br>**मुख्य घटक:**<br>वन संवर्धन परिचय, वृक्षांची वृध्दी, वनांच्या वाढीवर परिणाम करणारे घटक, वनस्पतींचे अनुक्रमण, राज्यातील महत्वाचे वनांचे प्रकार, वृक्षांचे वर्गीकरण, जोपासना, विरळणी. |
| 04 | **वृक्षांचे वनसंवर्धन शास्त्र (भाग-02)** | श्री. आर.बी.गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) रा. परतवाडा. | **उद्देश:** आर्थिक मूल्याच्या प्रजातींचे उत्पादन वाढवणे, प्रति युनिट वन उत्पादन वाढवणे, दर्जेदार लाकडाचे उत्पादन घेणे, दोन कापणीचे चक्रातील वर्षे कमी करणे, रिकाम्या भागात मानवनिर्मित जंगलांची निर्मीती करणे, मानवनिर्मित रोपवनांची निर्मिती करणे, विदेशी प्रजातीची वनामध्ये लागवड करणे.<br>**मुख्य घटक:**<br>सिल्विकल्चर वर्ण / गुणधर्म, निवडक वन वृक्ष प्रजातींचे वनसंवर्धन, नवीन वन निर्मिती आणि कापणीच्या पध्दती, निम्न वन प्रणाली. |
| 05 | **जैव विविधता व्यवस्थापन** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** पृथ्वीवरील विविध जीवसृष्टीचे संरक्षण व संतुलन राखणे.<br>**मुख्य घटक:** जैवविविधतेची संकल्पना आणि स्तर, आनुवंशिक, प्रजातीगत, परिसंस्थात्मक.<br>**जैवविविधतेचे महत्त्व:** पर्यावरणीय, आर्थिक, औषधी, सांस्कृतिक. स्थानिक व लुप्तप्राय प्रजातींचे संवर्धन.<br>**संरक्षित क्षेत्रे** - राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, राखीव क्षेत्रे. |
| 06 | **जल व मृद संधारण** | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता, रा.परतवाडा. | **उद्देश:** पाणी आणि मातीचे संवर्धन करून वन व कृषी उत्पादन टिकवून ठेवणे.<br>**व्याख्या** : उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन करणे. |
| 07 | **वनकायदे** | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. (से.नि.) | **उद्देश:** वनसंरक्षण, वनव्यवस्थापन व वनातील गुन्ह्यांचे नियंत्रण यासाठी कायदे समजणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **मुख्य घटक:** भारतीय वन अधिनियम, 1927 (Indian Forest Act).<br>वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 (Wildlife Protection Act).<br>वनसंवर्धन अधिनियम, 1980 (Forest Conservation Act).<br>अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वनवासी (अधिकार मान्यता) अधिनियम, 2006 (FRA).<br>वनगुन्हे ओळखणे, पंचनामा, जप्ती, न्यायालयीन कार्यवाहीची मूलभूत माहिती. |
| 08 | **वन अभियांत्रिकी** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वनसंपत्तीच्या योग्य व्यवस्थापनासाठी अभियांत्रिकी तत्वांचा वापर करणे. वनउत्पादनांची सुरक्षित, कार्यक्षम व शाश्वत वाहतूक सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक** : वन रस्ते, पूल, जलसंधारण रचना उभारणी, मृद व जलसंरक्षण अभियांत्रिकी, लाकूड उत्खनन व वाहतूक तंत्र,यांत्रिक साधनांचा वापर व देखभाल |
| 09 | **व्यवस्थापकीय कौशल्य** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : वनक्षेत्रातील कामकाज प्रभावी, समन्वित व नियोजित रीतीने पार पाडणे. कार्यसंघ अधिक सक्षम व परिणामकारक बनवणे.<br>**मुख्य घटक**: नियोजन, संघटन, मार्गदर्शन व नियंत्रण नेतृत्व, निर्णयक्षमता व समस्या निराकरण मनुष्यबळ व्यवस्थापन व संवादकौशल्य. |
| 10 | **कुरण विकास व्यवस्थापन** | प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश** : पशुधन व वन्यजीवांसाठी शाश्वत चारापूरवठा उपलब्ध करणे. कुरणांची माती, पाणी व जैवविविधता सुधारणा करणे.<br>**मुख्य घटक**: कुरणांचे सर्वेक्षण, मृद व हवामान मूल्यांकन गवत लागवड, सुधारणा व व्यवस्थापन चाराप्रकार, वन्यजीवांसाठी चराईक्षेत्र विकास. |
| 11 | **वन्यजीव व्यवस्थापन** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व त्यांचा नैसर्गिक अधिवास टिकवणे. जैवविविधता संतुलित ठेवणे.<br>**मुख्य घटक**: अधिवास संरक्षण, परिसंस्था संवर्धनवन्यजीव गणना, निरीक्षण व संशोधनमानव-वन्यजीव संघर्ष नियंत्रणसंरक्षित क्षेत्रांचे नियोजन. |
| 12 | **वनमिती** | श्री. एस.एन.गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : जंगलातील लाकूडसंपत्तीचे अचूक मूल्यांकन करणे. कार्ययोजना व वनसंपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करणे.<br>**मुख्य घटक**: वृक्ष मापन पद्धती (उंची, व्यास, घनफळ) वनक्षेत्र सर्वेक्षण तंत्रनमुना सर्वेक्षण व डेटा विश्लेषण. |
| 13 | **मृदशास्त्र** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : खडक व माती, पृथ्वीचे आवरण, अग्निजन्य, जलयजन्य व रुपांतरित खडक व त्यांचे विविध प्रकार, खडक व खनिजांचे विघटन.<br>**मुख्य घटक**: मातीची उत्पत्ती, रचना, गुणधर्ममृद प्रकार, सुपीकता, पोषकतत्त्वेमृद अपरदन व जलसंरक्षण तत्वे, भौतिक व रासायनिक जैविक कारके व प्रक्रिया, जमिनीचा पोत व जमिनीची घडण, आम्ल-विम्ल निर्देशांक, महत्वाचे मातीचे प्रकार व गुणधर्म. |
| 14 | **भुमि अभिलेख** | श्री. हेमंत शेवाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, पाल. | **उद्देश** : वनक्षेत्राची स्पष्ट, संगणकीकृत व अचूक नोंद राखणे. सीमावाद टाळणे व जमीन व्यवस्थापन सुलभ करणे.<br>**मुख्य घटक**: नकाशे, भू-मापन, सातबारा व इतर अभिलेखभू-सीमा निर्धारण, दुरुस्ती व डिजिटल नोंद GIS, GPS वापर. |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | **पुनरुत्पादन पध्दती ( वनसंवर्धन शास्त्र भाग-3)** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश**: जंगलांचा सातत्यपूर्ण वाढीचा वेग टिकवून ठेवणे. हरितक्षेत्र वाढवणे व लाकूडसंपत्तीची स्थिर उपलब्धता सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक**: प्राकृतिक पुनरुत्पादन (बी उगवण, अंकुरोत्पादन) कृत्रिम पुनरुत्पादन (लागवड, बियाणे पेरणी, रोपवाटिका) कापणी पद्धती, पुनरुत्पादन निरीक्षण, वनांची पुनरुत्पती, नैसर्गिक पुनरुत्पत्ती, मियावाकी वृक्षारोपन पध्दती. |



वरील सर्व विषय वनरक्षक प्रशिक्षणाचा मूलभूत पाया आहेत. या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थीला वनव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि कायदेशीर चौकटीत राहून वनसेवा कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते.

**02. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 19/11/2025 )**

**( विषय: वनमिती, व्याख्याते श्री. एस.एन.गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.)**






वनमिती या विषयावर प्रशिक्षणार्थींचा फील्ड वर्क घेण्यात आला. या फील्ड वर्कमध्ये वनातील वृक्ष व वनसंपत्तीचे मोजमाप व मूल्यमापन कसे करावे याबाबत प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. यामध्ये वनमितीची ओळख व महत्व समजावून सांगण्यात आले. तसेच वृक्षांचे उंची, घेर (GGH), व्यास (DBH) मोजण्याच्या पध्दती सांगण्यात आल्या. आणि मोजण्यासाठी वापरली जाणारी साधने जसे की मोजपट्टी, कॅलिपर, हायपोमीटर, क्लिनोमीटर यांची माहिती देण्यात आली. व वृक्षाचे घनफळ कसे काढावे याची प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. वनक्षेत्रातील नमुना भूखंड (सॅम्पल प्लॉट ) कसे निवडावेत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. व मिळालेल्या मोजमापांवरुन वनसंपत्तीचे मूल्यांकन व नोंदणी कशी करावी हे सांगण्यात आले. तसेच शाश्वत वनव्यवस्थापनासाठी वनमितीचे उपयुक्तत्व व महत्व स्पष्ट करण्यात आले.

**वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 01/12/2025 )**

**( विषय: वनकायदे, व्याख्याते, श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. (से.नि.)**





प्रशिक्षणार्थींचा वन कायदे या विषयावर फिल्ड वर्क घेण्यात आला. या फिल्ड वर्कचा उद्देश प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष क्षेत्रात वन कायद्यांची अंमलबजावणी कशी केली जाते, याची सखोल व व्यवहार्य माहिती देण्यात आली. तसेच वन कायद्यांची ओळख, प्रत्यक्ष क्षेत्रातील निरीक्षण, वन गुन्ह्यांची माहिती, वन कर्मचाऱ्यांची भूमिका आणि स्थानिक लोकांचा सहभाग या सर्व मुद्यांवर प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. तसेच वन कायद्यांची अंमलबजावणी, वनसंपत्तीचे संरक्षण, वन्यजीव संवर्धन तसेच पर्यावरण संतुलन राखण्याची जबाबदारी वनविभागावर असते. त्यामुळे या फील्ड वर्कमुळे प्रशिक्षणार्थींना वनविभागाचे प्रत्यक्ष कार्य, कायदेशीर प्रक्रिया आणि जबाबदाऱ्या समजून घेण्यास मदत झाली. व प्रत्यक्ष अनुभवातून वन कायद्यांचे महत्व व उपयोगिता समजली.

**वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थीचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 16/10/2025 )**

**( विषय:** वृक्षांचे वनसंवर्धन शास्त्र (भाग-02), व्याख्याते श्री. आर.बी.गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) रा. परतवाडा.)





संस्थेमधील दुर्मिळ औषधी वनस्पती वृक्षप्रजातींची ओळख करुन देण्यात आली. व त्यांचे मानव जातीला व वन्यप्राण्यांला होणारे फायदे व नुकसान सांगण्यात आले. तसेच स्थानिक लोकसहभात व शाश्वत वन व्यवस्थापनाचे महत्व स्पष्ट करण्यात आले.

**वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 16/10/2025 )**

**( विषय: वनसंवर्धन शास्त्र (भाग-01), व्याख्याते श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.)**




वनाच्या वाढीच्या तीन अवस्था आणि आकार नुसार वनाच्या वाढीचे प्रकार या बाबत माहिती दिली. याचबरोबर वनाच्या ज्या अवस्था असतात प्राथमीक अनुक्रमन व द्वितीय अनुक्रमन याची माहिती प्रत्यक्ष देण्यात आली. तसेच विरळणी खुरपनी यासारखे विकासात्मक कामे व जोपासात्मक कामे प्रशिक्षणार्थ्यांकडुन प्रत्यक्ष करवुन घेण्यात आले.

तसेच जैवविविधता म्हणजे काय याची सुध्दा माहिती प्रत्यक्ष स्वरुपात प्रशिक्षणार्थींना देण्यात आली.

**वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा**. ( दि. 10/10/2025 )

**( विषय: वनस्पतीशास्त्र, व्याख्याते डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा.)**



परीसरातील विविध वनस्पतींची ओळख करुन देण्यात आली. वनस्पतींचे शास्त्रीय नाव, स्थानिक नाव व कुटुंब यांची माहिती सांगण्यात आली. तसेच मुळ, खोड, पाने, फुले व फळे यांच्या रचना व कार्यानुसार अभ्यास करण्यात आला. औषधी, खाद्य व आर्थिक दृष्ट्या उपयुक्त वनस्पतींचे महत्व स्पष्ट करण्यात आले. या सोबतच वनस्पतींचे नमुने कसे गोळा करावेत व जतन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. व पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेचे महत्व प्रशिक्षणार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

## 03. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र लेखी परीक्षा.
## ( दि. 08/12/2025 ते 17/12/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 08/12/2025 ते 17/12/2025 या कालावधीमध्ये अप्रशिक्षित वनरक्षक सत्र क्र. 63 मधील सर्व प्रशिक्षणार्थ्यांची प्रथम सत्राची लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले. एकूण 47 प्रशिक्षणार्थी या परीक्षेमध्ये सहभागी झाले. ही परीक्षा **संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखली यशस्वीपणे व नियोजनबध्द पध्दतीने पार पडली.

परीक्षेचे वेळापत्रक पूर्वनियोजित पध्दतीने तयार करण्यात आले. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि नियमानुसार कार्यवाही करण्यात आली. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या.

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यवेक्षक यांनी आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. परीक्षेच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार आढळून आला नाही. प्रशिक्षणार्थ्यांनीही अत्यंत सकारात्मक व शिस्तबध्द सहभाग नोंदवून परीक्षेला सहकार्य केले.

| **प्रथम सत्र परीक्षा वेळापत्रक** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **वार** | **दिनांक** | **वेळ** | **विषय** | **गुण** |
| 01 | सोमवार | दि. 08/12/2025 | 10.00 ते 12.00 | 1.वनस्पती शास्त्र. (लेखी 40 गुण) प्रात्यक्षिक 10 गुण. | 50 |
| 02 | मंगळवार | दि. 09/12/2025 | 10.00 ते 12.00 | 1. पुनरुत्पादन पध्दती. | 50 |
| 03 | बुधवार | दि. 10/12/2025 | 10.00 ते 12.00 | 1. मृदशास्त्र (10 गुण) 2. मृद व जलसंधारण (40 गुण) | 50 |
| 04 | गुरुवार | दि. 11/12/2025 | 10.00 ते 12.00 | **अवकाश / सुट्टी** | |
| 05 | शुक्रवार | दि. 12/12/2025 | 10.00 ते 01.00 | 1. वन आणि वन्यजीव विषयक कायदे. (लेखी) | 100 |
| 06 | शनिवार | दि. 13/12/2025 | 10.00 ते 12.00 | 1. वनअभियांत्रीकी (20 गुण) 2. वनमिती (10 गुण) 3. भुमी अभिलेख (15 गुण) | 45 |
| 07 | रविवार | दि. 14/12/2025 | 10.00 ते 12.00 | **शासकिय सुट्टी** | |
| 08 | सोमवार | दि. 15/12/2025 | 10.00 ते 01.00 | 1. वन्यजीव व्यवस्थापन (70 गुण) 2. कुरण व्यवस्थापन (15 गुण)<br>3. जैवविविधता व्यवस्थापन (15 गुण) | 100 |
| 09 | मंगळवार | दि. 16/12/2025 | 10.00 ते 12.00 | 1. वनसंवर्धनशास्त्र भाग-1 (20 गुण) 2. वृक्षसंवर्धन आणि त्याचे समुपयोजन(30 गुण) | 50 |
| 10 | बुधवार | दि. 17/12/2025 | 10.00 ते 12.00 | 1. व्यवस्थापकिय कौशल्य (लेखी ) | 50 |

## 04. नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63
## द्वितीय सत्र अभ्यासक्रम.










## वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 द्वितीय सत्र अभ्यासक्रम.

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि**. 01/10/2025 पासुन नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र**. 63 यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणातील पथम सत्र पुर्ण झाले असुन द्वितीय सत्राला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **द्वितीय सत्र** अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 (कालावधी दि. 01/10/2025 ते 29/03/2026) | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र | विषय | व्याख्याते | विषयनिहाय माहिती |
| 01 | **कवायत** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ** (Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनसंरक्षण** | श्री. एस. एन. गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश**: वन संपदेचे तोड, अतिक्रमण, तस्करी व वनआग यापासून संरक्षण करणे. जैवविविधतेचे संवर्धन करणे. वनरक्षकांची जबाबदारी, अधिकार व कर्तव्यांची जाणीव करुन देणे.<br>**मुख्य घटक**: वनआग प्रतिबंध व नियंत्रण. अवैध वृक्षतोड व वाहतूक रोखणे. अतिक्रमण प्रतिबंध. वन्यजीव संरक्षण. वन कायदे व नियम ( वन अधिनियम, वन्यजीव संरक्षण अधिनियम ) गस्त व संरक्षणात्मक उपाय. |
| 03 | **रोपवाटीका** | श्री. एस. एन. गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश**: दर्जेदार व निरोगी रोपे तयार करण्याचे ज्ञान देणे. वृक्षलागवडीसाठी आवश्यक रोपांची उपलब्धता सुनिश्चित करणे. रोपवाटिका व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे.<br>**मुख्य घटक**: रोपवाटिकेची निवड व रचना. बी संकलन व बी प्रक्रिया. रोप तयार करण्याच्या पध्दती (पॉलिथीन बॅग, बेड पध्दत ). पाणी व्यवस्थापन. खत व कीड नियंत्रण. रोपांची निगा व वाहतूक. |
| 04 | **संयुक्त वनव्यवस्थापन** | श्री. एस. बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक, ( से. नि. ) | **उद्देश** : स्थानिक लोकांचा वनसंवर्धनात सहभाग वाढवणे. वन व ग्रामस्थ यांच्यात सहकार्य निर्माण करणे. वनसंपत्तीचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक** : संयुक्त वन व्यवस्थापन संकल्पना. वन संरक्षण समित्या (VSS) ग्रामस्थांचे हक्क व जबाबदाऱ्या. वनविभागाची भूमीका. लाभ वाटप प्रणाली. सामाजिक वनीकरणाशी संबंध. |
| 05 | **वनव्यवस्थापन** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : वनसंपत्तीचा नियोजित व शाश्वत वापर करणे. वनांचे उत्पादन व संरक्षण यामध्ये समतोल साधणे. दीर्घकालीन वन व्यवस्थापन नियोजन समजून घेणे.<br>**मुख्य घटक**: कार्ययोजना (Working Plan ) वन क्षेत्रांचे वर्गीकरण. तोड व पुनरुत्पादन पध्दती. वन नोंदी व अभिलेख. निरीक्षण व मूल्यांकन. वनरक्षकांची भूमिका. |
| 06 | **वनउपयोगिकरण** | श्री. आर. बी. गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी, ( से. नि. ) | **उद्देश : वन उपयोगिता** (Forest Utilization) वनसंपतीचा शाश्वत उपयोग कसा करावा हे शिकवण्यात आले.<br>**मुख्य घटक**: इंधन, औषधी वनस्पती, बांबू, गवत यांचा उपयोग स्थानिक समुदायाचा सहभाग बाजारपेठेतील मागणी व पूर्ती व्यवस्थापन. |
| 07 | **लेखा व कार्यालयीन कामकाज पध्दती** | श्री. जी.टी.महाजन, लेखाधिकारी, ( से. नि. ) | **लेखा व कार्यप्रणाली** (Accounts and Procedure)<br>वनविभागातील आर्थिक व्यवहार व प्रशासकीय प्रक्रिया समजावून देण्यात आली. अभ्यासाचे भाग: लेखा पुस्तिका व नोंदी, सरकारी निधीचा उपयोग, बजेट तयार करणे, रिपोर्ट लेखन व सादरीकरण. |
| 08 | **वनसर्व्हेक्षण** | श्री. एस. व्ही. कुंभकर्ण सर. | **उद्देश**: 1. वनक्षेत्राचे मोजमाप करणे. 2. वनसंपत्तीचे मुल्यांकन. 3. वन व्यवस्थापनासाठी माहिती मिळवणे. 4. वनसंरक्षण व संवर्धन. 5. वनविकास व नियोजन. 6. शासकीय नोंदी व कायदेशीर उपयोग.<br>**मुख्य घटक** : 1. क्षेत्र सर्व्हेक्षण. 2. नकाशा तयार करणे. 3. नमुना पध्दत. 4. वृक्ष मोजमाप. 5. रिमोट सेन्सिंग व GIS. 6. डेटा संकलन व विश्लेषण. 7. वन प्रकार वर्गीकरण. |

| | | | |
|---|---|---|---|
| 09 | **संगणक** | श्री. आनंद पिडीआर, तालुका व्यवस्थापक, आपले सेवा केंद्र, पंचायत समिती चिखलदरा. | **संगणक (**Computer)<br>प्रशिक्षणार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान देण्यात आले.<br>**अभ्यासाचे मुद्दे:** MS Office (Word, Excel, Power Point) ई-मेल व इंटरनेट वापर , वनविभाग संबंधित सॉफ्टवेअरचा उपयोग<br>**उद्देश:** कार्यालयीन कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर. |
| | | | |

या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थीला वनव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि कायदेशीर चौकटीत राहून वनसेवा कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते. यामुळे नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षकांना प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना आवश्यक ज्ञान, कौशल्य व जबाबदारीची जाणीव होते. हे प्रशिक्षण कार्यक्षम, शिस्तबध्द व जबाबदार वनरक्षक घडवण्यासाठी उपयुक्त ठरते. वरील सर्व विषय वनरक्षक प्रशिक्षणाचा मूलभूत पाया आहेत.

## 05. नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा सर्पमित्र संवाद प्रशिक्षण. ( दि. 26/12/2025 )






नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांना **श्री. अमीत नाईक, सर्पमित्र, रा. चिखलदरा** यांनी प्रशिक्षणार्थीला सर्पमित्र संवाद या विषयावर प्रशिक्षण दिले.

सदर प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरले. सर्पमित्रांनी सर्पांची ओळख, वर्तन, अधिवास, विषारी व अविषारी सर्पांमधील फरक, तसेच सर्पदंश प्रसंगी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष अनुभव व उदाहरणांच्या माध्यमातून दिलेल्या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. या प्रशिक्षणामुळे मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यास मदत होऊन वनरक्षकांची कार्यक्षमता व सुरक्षितता वाढेल.

## 06. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ. (माहे डिसेंबर 2025)







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ



नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक यांचे 06 महिने कालावधी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना विविध व्यायामाचे प्रकार शिकवण्यात येतात. यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांमध्ये उत्साह, आत्मविश्वास, संघ भावना तसेच सहकार्य वाढल्याचे प्रकर्षाने जाणवले.

सदर प्रशिक्षणार्थींना श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व  श्री. महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.





## 07. **वनरक्षक सत्र क्र. 63 यांचा आमझरी पर्यटन संकुल, चिखलदरा येथे अभ्यास दौरा.**

**(व्याख्याते श्री.महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा दि. 19/12/2025 )**








वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दिनांक 19/12/2025 रोजी **आमझरी पर्यटन संकुल,** चिखलदरा येथे अभ्यास दौरा करण्यात आला. सदर दौरा हा श्री. महादेव धुर्वे, सहा.कवायत शिक्षक (कंत्राटी) वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

**आमझरी पर्यटन संकुल,** चिखलदरा हे एकुण 10 हेक्टर परीसरामध्ये पसरलेला असुन सदर क्षेत्र हे मेळघाट वन्यजीव विभाग परतवाडा अंतर्गत गाविलगड रेंज चिखलदरा मध्ये येते. व या ठिकाणी काही Adventure Activities सुध्दा आहेत. त्यामध्ये स्काय सायकलिंग, हुमण गॅरो, बंजी इजेक्शन, झिप लाईन, वॉल क्लॅम्बींग इ. त्यांनंतर वनरक्षक सत्र क्र. 63 यांनी येथील बाणा कॅम्प ला भेट दिली त्याठिकाणी राहण्यासाठी जुने 8 टेंट व नविन 5 टेन्ट आहेत. तसेच या ठिकाणी आंबा, निलगिरी, जांभूळ, बहावा इ. झाडे आढळून आली. सदर दौरा बाबत प्रशिक्षणार्थीना श्री. श्याम पटोरकर, वनपाल, आमझरी पर्यटन संकुल, चिखलदरा यांनी प्रशिक्षणार्थीना योग्य ते मार्गदर्शन केले.

**08. वनरक्षक सत्र क्र. 63 यांचा गाविलगड किल्ला, चिखलदरा येथे अभ्यास दौरा.**
**( दि. 30/12/2025 )**





**वनरक्षक सत्र क्र. 63 यांचा गाविलगड किल्ला, चिखलदरा येथे अभ्यास दौरा.**





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दिनांक 30/12/2025 रोजी **गाविलगड किल्ला, चिखलदरा** येथे अभ्यास दौरा करण्यात आला. सदर दौरा हा श्री.आर.जी.मून, वनपरिक्षेत्र अधिकारी, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तसेच सदर क्षेत्र हे मेळघाट वन्यजीव विभाग परतवाडा, अंतर्गत गाविलगड परिक्षेत्र, चिखलदरा मध्ये येते. तसेच प्रशिक्षणार्थींना श्री. व्ही. एन. कास्देकर, वनपाल, गाविलगड परिक्षेत्र चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

या वेळी गवत बी संकलनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यामध्ये गवत बी कधी गोळा करावे, म्हणजे गवत पूर्णपणे परिपक्व झाल्यानंतर व बी पक्व अवस्थेत आल्यावरच संकलन करावे, तसेच कसे गोळा करावे, म्हणजे निरोगी व चांगल्या प्रतीच्या गवताची निवड करुन हाताने किंवा योग्य साधनांच्या साहाय्याने बी वेचावे, याची प्रत्यक्ष माहिती प्रशिक्षणार्थींना देण्यात आली. तसेच बी संकलन करताना गवताची नासधूस होणार नाही याची काळजी कशी घ्यावी, संकलित बी स्वच्छ करून वाळवण्याची पध्दत, तसेच साठवणूक कशी करावी याबाबतही प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी मुख्यत: विविध गवत प्रजातींची बी गोळा केली.

## 09. संत संताजी महाराज यांची जयंती. ( दि. 08/12/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 08/12/2025 रोजी **संत संताजी महाराज** यांची जयंती श्री. आर. जी. मून, वनपरिक्षेत्र अधिकारी, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. व संस्थे मध्ये सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

संत संताजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे जीवन व कार्य आठवणे अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी आपल्या आचरणातून साधेपणा, परिश्रम, निष्ठा व भक्ती यांचे महत्व समाजाला शिकवले. सत्य करुणा आणि मानवतेचा संदेश देत त्यांनी समाजात सद्भावना निर्माण केली. अन्यायाविरुध्द ठाम भूमिका घेऊन धर्म, नीती व आत्मबळ यांचा मार्ग दाखवला.

त्यांच्या विचारांनी माणसाला अंतर्मुख होऊन सद्गुणांचा स्वीकार करण्याची प्रेरणा दिली. आजच्या काळातही त्यांचे आदर्श आचारण मार्गदर्शक ठरते. संत संताजी महाराजांचे विचार आत्मसात करुन आपण सुसंस्कृत, एकसंध व मूल्याधिष्ठित समाज घडवू शकतो.

## 10. **वीर बाल दिवस** . ( **दि**. 26/12/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 26/12/2025 रोजी **वीर बाल दिवस** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांनी साजरा केला.

वीर बाल दिवस 26 डिसेंबर रोजी गुरु गोबिंदसिंह महाराजांचे चार पुत्र-साहिबजादे अजितसिंह, जुझारसिंह, जोरावरसिंह व फतेहसिंह यांच्या आद्वितीय शौर्य, त्याग व बलिदानाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. अल्पवयातच त्यांनी धर्म, स्वातंत्र्य व मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी अतुलनीय धैर्याचे दर्शन घडविले. अन्याय, अत्याचार व धार्मिक दडपशाहीसमोर न झुकता त्यांनी राष्ट्रनिष्ठा, कर्तव्यभावना व आत्मबलिदानाचा सर्वोच्च आदर्श प्रस्थापित केला.

साहिबजाद्यांचे बलिदान हे केवळ ऐतिहासिक घटना नसून नैतिक मूल्ये, धैर्य व सत्यनिष्ठेचे जिवंत प्रतीक आहे. त्यांच्या जीवनकार्यामुळे बालकांमध्ये आत्मसन्मान, निर्भयता, शिस्त व सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याची प्रेरणा मिळते.

वीर बाल दिवसाच्या निमित्ताने बालकांमध्ये संविधानिक मूल्ये, राष्ट्रप्रेम, मानवता व न्यायप्रियता यांचे संस्कार रुजविणे आवश्यक आहे. शिक्षणासोबतच चारित्र्यनिर्मिती व मूल्याधिष्ठित विचारसरणी विकसित करणे ही समाज व शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. साहिबजाद्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन सजग, जबाबदार व राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हेच या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.

11. **डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती.** ( दि. 27/12/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 27/12/2025 रोजी **डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

**डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख** यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य स्मरणे हे आपले कर्तव्य आहे. शिक्षण, शेती आणि ग्रामीन विकास या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. शेतकरी आणि कष्टकरी समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी शिक्षणाचा प्रसार हा मूलमंत्र मानला. विदर्भातील शैक्षणिक चळवळीला दिशा देत त्यांनी अनेक संस्था उभारल्या. समाजातील विषमता दूर करुन आत्मनिर्भर भारत घडवण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन प्रामाणिकपणा, सेवा आणि राष्ट्रभक्ती जोपासणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

12. **वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती, यांच्या मार्फत STRENGTHENING WILDLIFE LAW ENFORCEMENT या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा**. ( **दि**. 29/12/2025 **ते** 30/12/2025 )






दिनांक 29/12/2025 ते 30/12/2025 या कालावधी मध्ये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती**, यांच्या मार्फत STRENGTHENING WILDLIFE LAW ENFORCEMENT या विषयावर दोन दिवसीय **कार्यशाळा** आयोजित करण्यात आली होती. सदर प्रशिक्षण हे अत्यंत उपयुक्त ठरले.

# STRENGTHENING WILDLIFE LAW ENFORCEMENT या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा.

**प्रशिक्षणाचे उद्दिष्ट:**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे आयोजित दोन दिवसीय “STRENGTHENING WILDLIFE LAW ENFORCEMENT ” या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट वन्यजीव संरक्षणासंबंधी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे हे होते. वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 व इतर संबंधित कायद्यांची सखोल माहिती देणे, वन्यजीव गुन्ह्यांचे स्वरूप, तपास पध्दती, पुरावे संकलन, गुन्हे नोंदणी व न्यायालयीन प्रक्रिया याबाबत वन कर्मचाऱ्यांची क्षमता वाढविणे हे या प्रशिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट होते. तसेच वन्यजीव तस्करी व अवैध शिकारीस आळा घालण्यासाठी विभागीय समन्वय बळकट करणे हा देखील उद्देश होता.

**प्रशिक्षणातील सहभागी:**

सदर प्रशिक्षणामध्ये गुगामल वन्यजीव विभाग व मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या विविध क्षेत्रांतील वन कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा देखील समावेश होता. याशिवाय वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांतील प्रशिक्षणार्थी देखील या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

**कार्यपध्दती व प्रशिक्षणाचे स्वरुप:**

ही कार्यशाळा वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. प्रशिक्षणामध्ये व्याख्याने, प्रेझेंटेशन, प्रकरण अभ्यास ( Case Studies), प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित चर्चा तसेच प्रश्नोत्तर सत्रांचा समावेश होता. वन्यजीव गुन्ह्यांची नोंद, पंचनामा तयार करणे, पुराव्यांचे जतन, आरोपींविरुध्द कायदेशीर कारवाई तसेच न्यायालयीन कामकाज याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाचे स्वरुप व्यावहारिक व संवादात्मक ठेवण्यात आले होते.

**निरीक्षणे :**

प्रशिक्षणादरम्यान सहभागी कर्मचाऱ्यांमध्ये वन्यजीव संरक्षण व कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत मोठी उत्सुकता व कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत मोठी उत्सुकता व सकारात्मक सहभाग दिसून आला. अनेक सहभागींच्या प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभवांवर आधारित प्रश्न व चर्चा झाल्या. वन्यजीव गुन्ह्यांची वाढती आव्हाने लक्षात घेता अशा प्रकारच्या प्रशिक्षणांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. तसेच कायद्यांच्या योग्य वापरामुळे गुन्हेगारांवर प्रभावी कारवाई करणे शक्य असल्याचे निरीक्षणात आले.

**निष्कर्ष**

सदर दोन दिवसीय कार्यशाळा वन्यजीव संरक्षण व कायदा अंमलबजावणीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरली. या प्रशिक्षणामुळे सहभागी वन कर्मचाऱ्यांचे कायदेशीर ज्ञान, आत्मविश्वास व कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली. भविष्यात वन्यजीव गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी अभा प्रकारच्या कार्यशाळा नियमितपणे आयोजित करणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजात होऊन वन्यजीव संरक्षण अधिक प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## 13. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे कॅम्पा योजने अंतर्गत वनरक्षक / वनपाल यांचे 05 दिवसीय अल्प मुदत उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम (माहे डिसेंबर 2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 04 दि. 08/12/25 ते 12/12/25** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनरक्षक** | **विषय: उजळणी प्रशिक्षण. (वनरक्षक)** | | 28 |
| | | | 01. व्यक्तीमत्व विकास.<br>02. NLP ओळख आणि महत्व. | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 03. वन विभागातील जल व मृद संधारण कामे ( जागेची निवड, अंदाजपत्रक, M.B.) | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | |
| | | | 04. वन विभागातील ईमारतीचे बांधकाम ( अंदाजपत्रक, M.B. ई.)<br>05. वन्यजीव व्यवस्थापन. | श्री. एस.एम. सुरजुसे, सवस. से.नि. | |
| | | | 06. POSH-2013. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 07. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>08. वन्यजीव ( संरक्षण ) 1972 सुधारणा 2023.<br>09. अ. जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्क मान्य करणे ) अधिनियम-2006.<br>10. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023.<br>11. शंका निरसन. | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. से. नि. | |
| | | | 12. औषधी वनस्पती, दुर्मिळ वनस्पती व कुरण व्यवस्थापन.<br>13. औषधी वनस्पती, दुर्मिळ वनस्पती व गवताळ प्रजाती ओळख संस्थेचा परिसर. | श्री. आर. बी. गिरी, वनक्षेत्रपाल, से.नि. | |
| | | | 14. म.ना.से. (रजा) नियम 1981, सेवापुस्तक, शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ.<br>15. म.ना.से. (शिस्त व अपील ) 1979 पदग्रहण अवधी, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, NPS/UPS. | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखाअधिकारी, रा. अमरावती. | |
| | | | 16. ट्रेकिंग / क्षेत्रीय दौरा. | श्री. आर.जी. मून, अभिरक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. एस.आर.भिसे, सहा. अभिरक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| 02 | **सत्र क्र. 02 दि. 08/12/25 ते 12/12/25** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनपाल** | **विषय: उजळणी प्रशिक्षण ( वनपाल )** | | 17 |
| | | | 01. औषधी वनस्पती व दुर्मिळ वनस्पती ओळख.<br>02. रानभाज्या ओळख.<br>03. संस्थेच्या परिसरातील वनस्पतीची ओळख व क्षेत्रिय दौरा.<br>04. कुरण व्यवस्थापन.<br>05. वन्यजीव व्यवस्थापन. | श्री. आर. बी. गिरी, वनक्षेत्रपाल, से.नि. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 06. वन्यजीव अस्तित्व व पुरावे. | | |
| | | | 07. वन विभागातील जल व मृद संधारण कामे ( जागेची निवड, अंदाजपत्रक M.B.)<br>08. वनविभागातील ईमारतीचे बांधकाम ( अंदाजपत्रक M.B. ई. ) | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | |
| | | | 09. वन्यजीव वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>10. वन्यजीव ( संरक्षण ) 1972 सुधारणा 2023.<br>11. अ. जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ( वनहक्क मान्य करणे ) अधिनियम-2006.<br>12. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023. | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. से. नि. | |
| | | | 13. आगार व्यवस्थापन. | श्री. एस.एम. बिजागरे, लिपीक, से.नि. रा. परतवाडा. | |
| | | | 14. POSH-2013. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 15. ट्रेकिंग / क्षेत्रीय दौरा. | श्री. एस.एम. सुरजुसे, सवस. से.नि.<br>श्री. एस.आर.भिसे, सहा. अभिरक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. नितीन बघाये. | |
| | | | | **एकुण प्रशिक्षणार्थी** | 45 |

**वनरक्षक यांचे उजळणी प्रशिक्षण सत्र क्र. 04 ( दि. 08/12/2025 ते 12/12/2025 )**

**विषय: उजळणी प्रशिक्षण.**










वनरक्षक प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनपाल यांचे उजळणी प्रशिक्षण सत्र क्र. 02 ( दि. 08/12/2025 ते 12/12/2025 )**
**विषय: उजळणी प्रशिक्षण.**










वनपाल प्रशिक्षणार्थीचे 05 दिवसीय उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थीचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थीचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

## 14. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे कॅम्पा योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल व वनपाल यांचे 30 व 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण कार्यक्रम ( माहे डिसेंबर 2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 02 दि. 23/12/25 ते 21/01/26** | **कॅम्पा योजना अंतर्गत वनपाल** | **विषय: 30 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण.** | | 41 |
| | | | 01. प्रशिक्षणाबाबत सुचना. | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 02. CCT, DCT स्थळनिश्चिती.<br>03. LBS, स्थळनिश्चिती, आखणी.<br>04. गॅबीयन बंधारा स्थळनिश्चिती, आखणी.<br>05. सिमेंट नालाबांध स्थळनिश्चिती, आखणी.<br>06. अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>07. CCT, DCT,LBS प्रात्यक्षिक व शंकानिरसन.<br>08. CNB गॅबीयन, MNB प्रात्यक्षिक व शंकानिरसन. | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | |
| | | | 09. जंगल कामगार सहकारी संस्था व त्यांचे कार्य.<br>10. कुप काम, विक्री व इमारती मालाचा लेखा. | श्री. पी.एन.कैदलवार, वनमजुर. | |
| | | | 11. शासकीय वनउद्यान क्षेत्रिय दौरा. | श्री. नितीन बघाये, सहा. कवायत शिक्षक (कंत्राटी) वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 12. वनरक्षक व वनपाल यांची कार्ये नियतक्षेत्र तपासणी बाबत कार्यपध्दती.<br>13. वनगुन्हे हाताळण्याबाबतची कार्यपध्दती.<br>14. वन सीमा माहिती व संरक्षण पध्दती महाराष्ट्र वन नियमावली 2014.<br>15. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>16. वन्यजीव (संरक्षण) 1972 सुधारणा 2023.<br>17. शंकानिरसन.<br>18. वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम 2023 सुधारीत, ठळक तरतुदी.<br>19. जैविक विविधता (सुधारीत ) अधिनियम 2023 पर्यावरण संरक्षक अधिनियम 1986.<br>20. वन अपराध तपास पध्दती, नवीन भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2003 प्रमाणे आवश्यक तपासातील तरतुदी.<br>21. वनअपराध तपासपध्दती दस्तावेज तयार करणे. (प्रात्यक्षिक) | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. से. नि. | |
| | | | 22. Self Awareness.<br>23. Public Speaking & Presentation Skill.<br>24. Personality Development.<br>25. Positive Attitude.<br>26. Communication Skill.<br>27. Stress Management.<br>28. Time Management.<br>29. Conflict Management. | श्री. रागीब अहमद, तज्ञ व्य.वि. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 30. इमारत बांधकाम साहित्य माहिती.<br>31. वनविभागातील विविध इमारत बांधकामाबाबत माहिती.<br>32. ईमारत बांधकाम अंदाजपत्रकातील विविध बाबी.<br>33. इमारतीची देखभाल व दुरुस्ती.<br>34. मोजमाप व मोजमापांच्या पध्दती.<br>35. मोजमाप पुस्तिका.<br>36. बांधकाम प्रमाणके तयार करण्याची पध्दती. | श्री. एस.एम.सुरजुसे,<br>सवस. से.नि. | |
| | | | 37. रोपवन, रोपवाटीका.<br>38. क्षेत्रीय दौरा सेमाडोह-बोरी-हरिसाल नर्सरी, रोपवन. | श्री. एस.एन.गुल्हाने,<br>सहा. वनसंरक्षक. | |
| | | | 39. माहितीचा अधिकार अधिनियम-2005.<br>40. लोकसेवा अधिनियम-2015. | प्रा. राजेश पाटील,<br>रा. अमळनेर. | |
| | | | 41. वाईल्ड लाईफ क्राईम सेलची ओळख व कार्यपध्दती.<br>42. अनुसुचित 1 मधील वन्यप्राणी शिकार कारवाई व प्रात्यक्षिके.<br>43. दस्ताऐवज व पुरावा संकलन आणि न्याय वैद्यकिय प्रयोगशाळेचा वाटा.<br>44. Live Tower Location, Fire Cell, COVER आणि ALABI बाबत माहिती. | क्राईम सेल चमू,<br>अमरावती. | |
| | | | 45. सांपाविषयी मुलभूत माहिती. | श्री. अमित नाईक,<br>सर्पमित्र, चिखलदरा. | |
| | | | 46. संसुक्त वनव्यवस्थापन संकल्पना-उद्दिष्टे व दि. 5.10.2011 चा शा.नि.सं.व.व्य. कार्यपध्दती.<br>47. दि. 22.12.2011 चा शा.नि. ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती कार्यपध्दती.<br>48. वनपाल (सदस्य सचिव ) ची कर्तव्य जबाबदाऱ्या व पालन करावयाची तत्वे व सभा ग्रामसभा, बैठका वनपालाची भूमिका.<br>49. सं.व.व्य. समितीचा रोखलेखा पध्दती व वनपरिमंडळचा रोखलेखा समिती कामाचे मुल्यांकन पध्दती.<br>50. वनविभागातील मूल्यांकन पध्दती, मुल्यांकन आक्षेप व त्यांची उत्तरे.<br>51. विभागीय चौकशी नियम-पध्दती A.C.B. प्रकरणे.<br>52. म.ना.से. शिस्त व अपील / निलंबन, मत्ता व दायीत्व.<br>53. वरिष्ठांशी वागणुक, कनिष्ठांशी वागणुक व जनतेशी वागणुक.<br>54. कुपाचा उपचार नकाशा तयार करणे Coupe Marking कार्य आयोजना कक्ष इतिहास.<br>55. शंकानिरसन. | श्री.एस.बी.धर्माधिकारी,<br>सहा.वनसंरक्षक,<br>से.नि. | |
| | | | 56. पदग्रहण अवधी, रोकडवही व सेवापुस्तक.<br>57. म.ना.से. वर्तणुक नियम व सेवेच्या सर्वसाधारण शर्ती.<br>58. म.ना.से. रजा नियम, सेवेत असतांना मिळणारे शासकिय लाभ व सेवानिवृत्ती नंतर मिळणारे शासकीय लाभ.<br>59. वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती DCPS/UPS/NPS व आस्थापने संबंधी शंका व निरसन. | श्री.जी.टी.महाजन,<br>लेखाधिकारी से.नि. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 60. POSH-2013. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 61. कार्टींग चलान, ईमारती मालाची आवक, आवक रजिष्टर.<br>62. ग्रेडींग नियम, गट लावणे, लॉट रजिष्टर, लॉट लिस्ट व ईतर.<br>63. ईमारती मालाच्या लिलावाची कार्यपध्दती, ईमारती माल निर्गतीची कारवाई.<br>64. कुपातील कामकाजाची कार्यपध्दती.<br>65. कुपातील कामकाजाची कार्यपध्दती जारीदा परिक्षेत्रातील खारी कुप (TPWC) कुपातील कामाची प्रत्यक्ष पाहणी व अभ्यास. | श्री. एस.एम.बिजागरे, लेखापाल, से.नि. | |
| | | | 66. कुरण व्यवस्थापन. | प्रा.जी.डी.मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | |
| | | | | | |
| **02** | **सत्र क्र. 02 दि. 15/12/25 ते 28/01/26** | **कॅम्पा योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल** | **विषय: 45 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण.** | | **24** |
| | | | 01. सामान्य सुचना.<br>02. व्यक्तीमत्व विकास.<br>03. न्यूरो लिंगुविस्टिक प्रोग्रामिंग (NLP) ओळख आणि महत्व.<br>04. संवाद कौशल्य.<br>05. सकारात्मक भावनांचा विकास.<br>06. NLP द्वारे व्हीज्युलायजेशन व ग्रटीट्युड.<br>07. NLP रॅपो बिल्डींग.<br>08. NLP व डिस असोशियशन व शावर टेक्नीक चा वापर. | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 09. औषधी वनस्पती रानभाज्या व दुर्मिळ वनस्पती.<br>10. जैविक विविधता.<br>11. वन्यप्राणी अस्तित्व व पुरावे.<br>12. संस्थेच्या परिसरातील औषधी व दुर्मिळ वनस्पतींची ओळख.<br>13. शंकानिरसन. | श्री. आर. बी. गिरी, वनक्षेत्रपाल, से.नि. | |
| | | | 14. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) 1981 (मुळ नियम)-1,2.<br>15. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारीत वेतन ) नियम 2019 (7 वेतन आयोग ) प्रात्यक्षिक.<br>16. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारीत वेतन) नियम 2009 (6 वेतन आयोग) प्रात्यक्षिक.<br>17. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारीत वेतन) नियम 1998 (5 वेतन आयोग) प्रात्यक्षिक.<br>18. सेवानिवृत्ती विषयक लाभ.<br>19. सेवानिवृत्ती प्रकरण ऑन लाईन तयार करणे.<br>20. भविष्य निर्वाह निधी (प्रात्यक्षिकासह) | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखाअधिकारी, रा. अमरावती. | |
| | | | 21. ट्रॅकिंग. | श्री. नितिन बघाये, सहा.क.शि.व.प्र.सं. चिखलदरा. | |
| | | | 22. पदग्रहण अवधी.<br>23. म.ना.से. रजा नियम.<br>24. सेवापुस्तक. | कु. वैशाली दुधे, लेखापाल. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 25. जमाखर्च ताळमेळ.<br>26. निर्लेखन.<br>27. शंका निरसन. | | |
| | | | 28. पगार बिल तयार करणे. (प्रात्यक्षीक)<br>29. वर्ग 4 कर्मचाऱ्यांचे GPF बिल तयार करणे. | श्री. पवन पखाले,<br>तांत्रिक सहाय्यक. | |
| | | | 30. जंगल कामगार सहकारी संस्था व त्यांचे कार्य.<br>31. कुप काम, विक्री व इमारती मालाचा लेखा. | श्री.पी.एन.कैदलवार,<br>वनमजुर. | |
| | | | 32. **शासकीय वनउद्यान क्षेत्रीय दौरा**.<br>श्री. नितिन बघाये, सहा.क.शि.व.प्र.सं. चिखलदरा.<br>श्री. एस.एस.आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. आर.जी.मून, अभिरक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | | |
| | | | 33. चर्चासत्र. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |
| | | | 34. महाराष्ट्र कोषागार नियम.<br>35. महाराष्ट्र आकस्मीक खर्च, नियम.<br>36. मुंबई वित्तीय नियम व वित्तीय अधिकार.<br>37. भविष्य निर्वाह निधी नियम.<br>38. अर्थसंकल्प.<br>39. महाराष्ट्र आकस्मीक खर्च, नियम.<br>40. वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयके. | श्री. विजय डहाळे,<br>सहा.लेखा अधिकारी. | |
| | | | 41. Self Awareness.<br>42. Public Speaking & Presentation Skill.<br>43. Personality Development.<br>44. Positive Attitude.<br>45. Communication Skill.<br>46. Stress Management.<br>47. Time Management.<br>48. Conflict Management. | श्री. रागीब अहमद,<br>तज्ञ व्य. विकास. | |
| | | | | **एकुण प्रशिक्षणार्थी** | 65 |

**वनपाल प्रशिक्षणार्थींचे 30 दिवसीय व लिपीक / लेखापाल प्रशिक्षणार्थी यांचे 45 दिवसीय दिर्घ मुदत प्रशिक्षण हे नियमीतपणे सुरु असुन वनपाल प्रशिक्षणार्थी यांचे प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे दि.21/01/2026 रोजी आयोजीत केलेले आहे. व लिपीक / लेखापाल प्रशीक्षणार्थी यांचे प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे दि.28/01/2026 रोजी आयोजीत केले असुन प्रशिक्षणार्थींचे 30 व 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण हे सद्यास्थितीत नियमीतपणे सुरु आहे.**

# वनपाल व लिपीक / लेखापाल प्रशिक्षणार्थी यांचे वर्गातील सत्र ( माहे डिसेंबर 2025 )









## वनपाल व लिपीक / लेखापाल प्रशिक्षणार्थी यांचे व्यायाम व योगा (माहे डिसेंबर 2025)









## वनपाल व लिपीक / लेखापाल प्रशिक्षणार्थी यांचा शासकीय उद्यान चिखलदरा येथे शैक्षणिक दौरा (दि. 25/12/2025)






वनपाल व लिपीक/लेखापाल प्रशिक्षणार्थी यांचा **मेळघाट व्याघ्र प्रकल्प** गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा अंतर्गत येणाऱ्या शासकीय उद्यान चिखलदरा येथे दि. 25/12/2025 रोजी शैक्षणीक दौरा. सदर दौरा हा श्री. आर.जी.मून, व.प.अधिकारी वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्फत नेण्यात आला.